# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी - ३०२३३४१२, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९०००७
E-mail : 12desk@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


**कार्यालयीन आदेश**

क्रमांक : १२/आस्था/बदल्या/२०१८/१९८८
दिनांक : 28 JUN 2018

संदर्भ : १. महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५.
२. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : एसव्हीआर-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ , दिनांक ०९.०४.२०१८.
३. शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्रमांक : बदली-२०१८//प्र.क्र.(११९/१८)/तांशि-१, दिनांक २६.०६.२०१८.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) व कलम ४(५) मधील तरतुदीनुसार संदर्भ क्रमांक ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या मान्यतेनुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील **संस्थांमध्ये कार्यरत गट क मधील ग्रंथपाल या राज्यस्तरीय** पदावर कार्यरत खालील कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव, पदनाम व सध्याचे कार्यरत ठिकाण | बदलीनंतर पदस्थापनेचे ठिकाण | बदलीचे कारण |
|---|---|---|---|
| १. | श्री. अनिल सुदाम वाडते, ग्रंथपाल, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे रिक्त असलेल्या ग्रंथपाल पदावर बदलीने. | विनंती |
| २. | श्रीमती आरती रविंद्र आयचित, ग्रंथपाल, शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज येथे श्री.अनिल सुदाम वाडते यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या ग्रंथपाल पदावर बदलीने. | विनंती |

२. सदर बदली आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता सर्व नियंत्रक अधिकारी यांनी खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(१) बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यावर सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांनी पर्यायी कर्मचारी हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या कर्मचाऱ्यांस दिनांक १५ जुलै, २०१८ (म.नं.) पर्यंत कार्यमुक्त करावे.

(२) बदली झालेले कर्मचारी त्यांच्या पूर्वीच्या पदस्थापनेच्या ठिकाणाहून कार्यमुक्त होवून रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. एखाद्या कर्मचाऱ्यास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षा काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित नियंत्रक अधिकाऱ्याला जबाबदार धरण्यात येईल.

(३) बदलीच्या आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील.

(४) सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे दिनांक १५ जुलै, २०१८ पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या संस्थेने / कार्यालयाने काढावे. दिनांक १६ जुलै, २०१८ पासूनचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्वीच्या संस्थेकडून / कार्यालयाकडून काढण्यात येवू नये. सदर वेतन संबंधित कर्मचारी बदलीच्या ठिकाणी हजर झाल्यानंतर बदलीनंतरच्या संस्थेने / कार्यालयाने काढावे व तसा अहवाल या संचालनालयास सादर करावा. दिनांक १६ जुलै, २०१८ पासूनचे वेतन बदलीपूर्वी कार्यरत असलेल्या संस्थेतील / कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल.

३. उपरोक्त कर्मचाऱ्यांची बदली प्रशासकीय कारणास्तव करण्यांत आलेली असल्याने त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च, पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, सातारा / सांगली / रत्नागिरी . **(मानार्थ) (संबंधित संस्था /कार्यालय प्रमुखांमार्फत )**

**त्यांना कळविण्यांत येते की, सदर आदेशान्वये बदल्या केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे दिनांक १५ जुलै, २०१८ पर्यंतचे वेतन सध्या कार्यरत असलेल्या संस्थेमार्फत / कार्यालयामार्फत अदा करावयाचे आहे. दिनांक १६ जुलै, २०१८ पासूनचे वेतन बदली झालेल्या संस्थेमार्फत / कार्यालयामार्फत अदा करावयाचे आहे.**

३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे.

**त्यांना कळविण्यांत येते की, सदर बदल्या कार्यान्वीत करण्यासाठी त्यांच्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करुन एकत्रित अनुपालन अहवाल त्वरीत या कार्यालयास सादर करावा.**

४. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड.

५. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज / रत्नागिरी.

**वरील क्रमांक ४ ते ५ यांना कळविण्यांत येते की, संबंधित कर्मचाऱ्यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यांत यावे / बदलीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यांत यावे. दिनांक १६.०७.२०१८ नंतर संबंधित कर्मचाऱ्यांना बदलीपूर्वीच्या ठिकाणावरुन त्यांचे वेतन अथवा कोणतीही देयके अदा करु नयेत.**

८. संबंधित कर्मचारी. **(संबंधित कार्यालय / संस्था प्रमुखांमार्फत)**

९. कार्यासन क्र. १२, मुख्य कार्यालय, मुंबई **(निवड नस्ती)**